**MHSO100023112023**

<u>वि.दि.दा.क्र.२२५/२०२३ मधील निशाणी क्र.२७ खालील आदेश</u>

वादीने सदरचा अर्ज त्याच्याविरुध्द नि.क्र.२० च्या अर्जावर जो विना म्हणणेचा आदेश झाला आहे तो रद्द होऊन मिळण्यासाठी व त्याचा जबाब दाखल करुन घेण्यासाठी केलेला आहे. वादीने सदरच्या अर्जात कथन केले आहे की, त्याने सदरचा दावा अग्रहक्काने खरेदी होवून मिळण्यासाठी, जाहिर ठराव होवून मिळण्यासाठी व कायमचे मनाई हुकूमासाठी दाखल केला आहे. सदरच्या दाव्याचे कामकाज चालू असताना, प्रतिवादी क्र.१ ने दिवाणी प्रक्रिया संहिताचे, क्रम–७, नियम–११ अन्वये ता.२६.०४.२०२४ रोजी अर्ज दिला आहे. सदरचे अर्जास वादीने म्हणणे दाखल न केल्यामुळे ता.०३.०२.२०२५ रोजी न्यायालयाने त्याच्याविरुध्द विना म्हणणेचा आदेश पारित केला आहे. वादीला हर्नियाच्या आजारपणामुळे व झालेल्या ऑपरेशनमुळे न्यायालयात हजर राहून सदरच्या अर्जास म्हणणे दाखल करता आले नाही. सदरचे म्हणणे दाखल करण्यास १२ महिन्यांचा विलंब झालेला आहे. सदरचा विलंब त्याने जाणीवपुर्वक केलेला नाही. म्हणून त्याने त्याचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

२. सदरचे अर्जास प्रतिवादीने जबाब दिलेला असून त्यामध्ये त्याने वादीच्या अर्जातील सर्व कथन नाकारले आहे. त्याने पुढे म्हटले आहे की वादीने जबाब न दाखल करण्याचे संयुक्तीक कारण दिले नाही. म्हणून सदरचा अर्ज मंजूर करण्यास त्याने हरकत घेतली आहे व सदरचा अर्ज फेटाळण्याची विनंती केली आहे.

३. वर नमूद केलेल्या कथनांचा विचार करुन माझे विचारार्थ खालील मुद्दे आहेत व त्या मुद्दयावर मी माझे कारणांसह निष्कर्ष नोंदवित आहे.

| अ.क्र. | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | विना जबाब आदेश रद्द करणे आवश्यक आहे काय? | ..... होय. |
| २. | आदेश काय? | .... अंतिम आदेशाप्रमाणे. |

**कारणमिमांसा**

**मुद्दा क्र.१ बाबतः–**

४. मी वादीतर्फे विद्वान वकील श्री.निकम व प्रतिवादीतर्फे विद्वान वकील श्री.वाघमोडे यांचा युक्तिवाद ऐकला. तसेच सदरच्या प्रकरणांमधील संबधीत दस्तऐवज पाहिले. प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी नि.क्र.२० चा अर्ज हा ता.२०.०४.२०२४ रोजी दाखल केला आहे. सदरचे अर्जास वादीने म्हणणे दाखल न केल्यामुळे ता.०३.०२.२०२५ रोजी न्यायालयाने त्याच्याविरुध्द सदरच्या अर्जाचे कामकाज विना म्हणणे चालविणेबाबतचा आदेश पारित केला आहे. त्यानंतर ता.०४.०८.२०२५ रोजी वादीने सदरचा अर्ज दिलेला आहे व

अर्जासोबत त्याचे म्हणणे दाखल केले आहे. सदरचे नि.क्र.२० चे अर्जाचे कायमचे निराकरन करण्यासाठी व वादीला त्याची बाजू मांडणेसाठी संधी देणेसाठी त्याच्याविरूद्ध झालेला विना जबाब आदेश रद्द करुन त्याचे लेखी म्हणणे दाखल करण्यास परवानगी देणे न्यायाच्या हितार्थ आवश्यक आहे. वादीस जर सदरची संधी देण्यात आली नाही तर त्याला न्याय नाकारलेसारखे होईल. तसेच दोन्ही पक्षकारांचा पूर्ण पुरावा न्यायालयासमोर आला तर न्यायालयाला योग्य न्यायनिवाडा करणे सोयीचे होईल. त्यामुळे वादीच्या विरूद्ध झालेला विना जबाब हा आदेश रद्द करणे व त्याचा जबाब दाखल करण्यास परवानगी देणे आवश्यक आहे. म्हणून मी मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.२ बाबतः–**

५. मी वर नमुद केल्याप्रमाणे सदरचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. म्हणुन मी मुद्दा क्र.२ चे उत्तरासाठी खालील अंतिम आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

सदरचा निशाणी क्र.२७ चा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by GHANWAT SOPAN DASHRATH
Date: 2025.09.29 17:38:29 +0530

ता.२९.०९.२०२५

(सो.द.घनवट)
दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर,
माळशिरस.

**<u>वि.दि.दा.क्र.२२५/२०२३ मधील</u>**

**<u>निशाणी क्र.२७ खालील आदेश</u>**

**<u>शेरा</u>**

मी शपथेवर सांगतो की, या पी.डी.एफ. आदेश फाईल मधील मजकूर हा मूळ आदेशातील मजकूराशी शब्द न शब्द सारखा आहे.

लघुलेखकाचे नाव – श्री.म.पां.सदाफुले.

कोर्टाचे नाव – दि. न्या. व. स्तर, माळशिरस.

न्यायनिर्णयाचा मजकूर सांगितल्याचा दि.२९.०९.२०२५.

न्यायनिर्णय टंकलिखित केलेला दि.२९.०९.२०२५.

न्यायनिर्णय स्वाक्षरीत केल्याचा दि.२९.०९.२०२५.

न्यायनिर्णय अपलोड केल्याचा दि.२९.०९.२०२५.

स्वाक्षरीत/–

दि.२९.०९.२०२५. (श्री.म.पां.सदाफुले)

लघुलेखक ग्रेड – २,

दिवाणी न्यायालय, व. स्तर, माळशिरस.